# बोर्ड प्रश्नपत्रिका : जुलै २०१७

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

iii. **१ ते ५** प्रश्न इतिहास व **६ ते ९** प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

**प्र.१. (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत लिहा.** [३]

१. औद्योगिक क्रांतीचे माहेरघर _______ ला म्हटले जाते.
(फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी)

२. इंग्रजांनी जहांगीर बादशहाकडून _______ येथे वखार स्थापन करण्याची परवानगी मिळवली.
(मुंबई, सुरत, कालिकत)

३. अठराव्या शतकापर्यंत आफ्रिकेस _______ म्हणून ओळखले जात होते.
(गुलामांचा देश, अज्ञात खंड, मागासलेले देश)

**(ब) 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब'स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा:** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | केमालपाशा | अ. | भारतीय अणुयुगाचे जनक |
| २. | कार्ल मार्क्स | ब. | जनता पक्ष |
| ३. | डॉ. होमी भाभा | क. | फॅसिस्ट पक्ष |
| | | ड. | कम्युनिस्ट मॅनिफेस्टो |

**प्र.२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [४]

१. जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करा.

२. राष्ट्रसंघाला अपयश का आले?

३. जपानला संन्यासी राष्ट्र का म्हणत असत?

**प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [४]

१. युरोपात लष्करवाद वाढीस लागला.

२. सुरक्षा समिती युनोचे हृदय होय.

३. युरोपीय राष्ट्रांचे आफ्रिकेकडे लक्ष वेधले गेले.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [६]

१. इंग्लंड, फ्रान्स, रशिया या राष्ट्रांना बाल्कन प्रदेशाचे महत्त्व का वाटत होते?

२. कार्ल मार्क्सचे विचार थोडक्यात सांगा.

३. जालियनवाला बाग हत्याकांडाची माहिती लिहा.

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [८]

१. साम्राज्यवादाची कारणे लिहा.

२. दुसऱ्या महायुद्धाची कोणतीही चार कारणे सांगा.

३. जागतिकीकरणाचे फायदे विशद करा.

**प्र.६. कंसातील योग्य शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा व विधाने पुन्हा लिहा.** [३]

१. लोकशाहीत सर्व नागरिकांना मतदानाचा _______ अधिकार असतो.
(समान, असमान, मर्यादित, अप्रत्यक्ष)

२. _______ नसेल तर राजकीय समानता निरर्थक ठरू शकते.
(श्रीमंती, सामाजिक समानता, देशाची प्रगती, जागरूकता)

३. भारताने _______ शासन पद्धत स्वीकारली आहे.
(एकात्म, संघराज्य, अध्यक्षीय, मर्यादित राजेशाही)

**प्र.७. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा (पाचपैकी तीन):** [३]

१. प्रत्यक्ष लोकशाही म्हणजे काय?
२. राजकीय पक्ष म्हणजे काय?
३. संघराज्य म्हणजे काय?
४. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील एक फरक सांगा.
५. सामाजिक दडपणाचे कोणतेही एक उदाहरण सांगा.

**प्र.८. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (तीनपैकी दोन):** [४]

१. भारतात कायद्याचा प्रस्ताव मांडण्याची जबाबदारी कायदेमंडळाकडे आहे.
२. अमेरिकेत नागरिकांना शस्त्रे बाळगण्यावर बंधन नाहीत.
३. जेव्हा दोन किंवा दोनपेक्षा जास्त पक्ष एकत्र येऊन सरकार बनवतात तेव्हा ती द्विपक्षपद्धती असते.

**प्र.९. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दांत लिहा:** [२]

१. व्यक्तिस्वातंत्र्याविषयीची आव्हाने कोणती ते लिहा.
२. संघराज्य पद्धतीवर टीप लिहा.